ठाणेनगर वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/२८३/२०२५ दि. २८/१२/२०२५

"वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

ज्याअर्थी, ठाणे वाहतुक विभागाचे कार्यक्षेत्रातील ठाणेनगर वाहतुक उपविभागाचे हद्दीत अहिल्यादेवी घाट ते तलावपाली येथे कोपिनेश्वर सांस्कुतिक न्यास, ठाणे यांचे वतीने नववर्ष स्वागता निमित्ताने दि.३१/१२/२०२५ रोजी सायंकाळी १६:०० ते २३:०० पावेतो गंगा आरती आयोजन करण्यात आलेले आहे. सदर वेळी मोठया प्रमाणात भाविक सहभागी होणार आहेत. त्यामुळे सदर परीसरात वाहतूक कोंडी होवु नये व परीसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या साईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:–

प्रवेश बंद – **१)** ठाणे रेल्वे स्टेशन येथून टॉवर नाका मार्गे डावीकडे वळून गोखले रोड कडे जाणारे सर्व बसेस व सर्व प्रकारची वाहने यांना टॉवर नाका येथून **डावीकडे वळणाचे ठिकाणी "प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरच्या बसेस या सॅटीस ब्रिज वरून प्लॅटफॉर्म क्र. १ कडून गोखले रोड मार्गे नौपाडा हद्दीत जातील. व इतर वाहने टॉवर नाका सरळ टेंभी नाका, सिव्हील कॉर्नर येथून इच्छित स्थळी जातील.

तात्पुरता प्रवेश मार्ग – मुस चौक येथून यापूर्वी बाबा फालुदा कडे जाणारे उजवे वळण येथे सर्व वाहनांना **प्रवेश बंद** करण्यात आलेला आहे. परंतु सदर ठिकाणी तात्पुरता बदल करून हा मार्ग उजवे वळणासाठी **खुला** करण्यात येत आहे.

प्रवेश बंद – **२)** जी.पी.ओ, कोर्टनाका येथून आंबेडकर पुतळा, टॉवर नाका व जांभळी नाका मार्गे स्टेशन येथे जाणारे बसेस यांना **जी.पी.ओ.** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरच्या बसेस या जी.पी.ओ, जेल रोड, क्रिक नाका, सिडको रोड मार्गे इच्छीत स्थळी जातील.

नो पार्किंग – जवाहर बाग, अग्निशामक केंद्र ते माता रमाबाई चौक पर्यंत रोडचे उजवे व डावे दोन्ही बाजुस तसेच माता रमाबाई चौक ते गांवदेवी कट, महागिरी पर्यत रोडचे दोन्ही बाजुस वाहने उभी करण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदरची अधिसुचना **दि. ३१/१२/२०२५ रोजी सायंकाळी १६:०० वा. ते रात्रौ २३:०० वा. पर्यंत** अंमलात राहील.

सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागु राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१ / वि.शा. ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे,
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
प्रत:– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२ / – सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.
प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२ / – सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी. नौपाडा, ठाणेनगर, कळवा, राबोडी वाहतूक उपविभाग ठाणे.